R.No. MHAMAR/25/A3029

R.No. MHAMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ६ वे, अंक नं. : ९२

दि.२२ मार्च २०२६,वार: रविवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक - अशोक हनवते मो. 9421094991, 7264079990

# माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या वाढदिवसा निमित्त जिल्ह्यामध्ये विविध उपक्रम राबविण्यात आले

## व्ही.डी.एफ. कॉलेज ऑफ पॉलटेक्निक् येथे वृक्षारोपण



लातूर प्रतिनीधी :माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतीक कार्य मंत्री, तथा मुख्य प्रतोद महाराष्ट्र विधीमंडळ काँग्रेस पक्ष आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त विलासराव देशमुख फाऊंडेशन, लातूर कडून .डी.एफ. कॉलेज ऑफ पॉलटेक्निक् येथे वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

यावेळी संस्थेचे संचालक श्री. विजय देशमुख यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी व्ही.डी.एफ. कॉलेज ऑफ पॉलटेक्निक्‌चे प्राचार्य श्री. साखरे, व्ही.डी.एफ. कॉलेज ऑफ इंजिनिअरींगचे प्राचार्य श्री. शिंदे व संस्थेतील सर्व प्राध्यापक, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## टवेन्टीवन शुगर्स लि. युनिट-१ मळवटी येथे मोठया उत्साहात साजरा





लातूर प्रतिनीधी :माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांच्या वाढदीवसानिमीत्त टवेन्टीवन शुगर्स लि. युनिट-१ मळवटी ता. जि. लातूर येथील कारखानास्थळावर अभिष्टचिंतन सोहळा उत्साहात संपन्न झाला.

माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांच्या वाढदीवसानिमीत्त मळवटी येथील ग्रामदैवत हनुमान मंदिर व महादेव मंदिर येथे मळवटी गावातील सरपंच गोविंद गरड यांच्या हस्ते रुद्राअभिषेक करण्यात आला. त्यानंतर वाढदिवसानिमित्त केक कापुन आनंद व्यक्त केला.

यानंतर बोडका येथील प्रसिद्ध किर्तनकार ह.भ.प. ऋषिकेश महाराज कदम यांचे किर्तन झाले. महाराजांनी अनेक दृष्टांत-सिध्दांत देऊन श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. ज्ञानदान व अन्नदान हेच श्रेष्ठदान आहे असे सागुंन त्यांचे महत्व विशद केले. माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांना उदंड आयुष्य लाभो अशी सर्वाचें वतीने ईश्वरचरणी प्रार्थना केली. यांनतर सर्व भाविकांनी महाप्रसादास घेतला.

यानंतर कारखाना स्थळावर कारखान्याचे जनरल मॅनेजर संतोष बिरादार सर्व खातेप्रमुख, विभाग प्रमुख, अधिकारी व कर्मचारी यांच्या हस्ते वृक्षारोपन करण्यात आले.

कार्यक्रमास पंचक्रोशीतील गावकरी, प्रतिष्ठीत नागरीक, ऊसतोड व वाहतुक ठेकेदार, कामगार उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करणेसाठी कारखान्यातील सर्व विभागातील कर्मचारी यांनी मोठा सहभाग घेतला. सर्व खातेप्रमुख, विभाग प्रमुख, अधिकारी व कर्मचारी, सुरक्षा यांनी एकजुटीने राहुन कार्यक्रम संपन्न केला.

## टवेन्टीवन शुगर्स युनिट-३ शिवणी येथे रुद्राभिषेक, वृक्षारोपण आणि ह.भ.प. मधुकर महाराज सायाळकर यांच्या कीर्तनाने रंगला सोहळा



लोहा (प्रतिनिधी): माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त टवेन्टीवन शुगर्स लि. युनिट-३ शिवणी (जा.), ता. लोहा, जि. नांदेड येथे विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांनी अभिष्टचिंतन सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

सोहळ्याची सुरुवात धार्मिक विधींनी झाली. टवेन्टीवन शुगर्सच्या वतीने ग्रामदैवत हनुमान मंदिर व महादेव मंदिर येथे प्रगतशील शेतकरी पुंडलिकराव येडे यांच्या हस्ते 'रुद्राभिषेक' करण्यात आला. तसेच कारखाना स्थळावरील जिरगा मारोती मंदिरात मुख्य शेतकी अधिकारी सचिन शिंदे यांच्या हस्ते अभिषेक करून आमदार देशमुख यांना उदंड आयुष्य लाभो, अशी प्रार्थना करण्यात आली.

**५० वृक्षांची लागवड व केक कापून आनंदोत्सव**

कारखाना स्थळावर कारखान्याचे जनरल मॅनेजर सुभाष सुरवसे यांच्यासह सर्व खातेप्रमुख, विभाग प्रमुख, अधिकारी व कर्मचारी यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी एकूण ५० वृक्षांची लागवड करून पर्यावरणाचा संदेश देण्यात आला. त्यानंतर आमदार अमित देशमुख साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त केक कापून आणि फटाक्यांची आतिषबाजी करून आनंद व्यक्त करण्यात आला.

यानिमित्त परभणी येथील प्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. विनोदाचार्य मधुकर महाराज सायाळकर यांचे कीर्तन संपन्न झाले. त्यांनी काकड्यातील पहिल्या मंगल चरणातील पाचव्या अभंगावर (करुनी उचित / प्रेम घाली हृदयात...) सविस्तर निरूपण केले. ज्ञानदान आणि अन्नदान हेच जगात श्रेष्ठ दान आहे, असे सांगत महाराजांनी विविध दृष्टांत व सिद्धांतांच्या माध्यमातून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

कीर्तनानंतर उपस्थित सर्व भाविक, पंचक्रोशीतील नागरिक, ऊसतोड व वाहतूक ठेकेदार आणि कामगारांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कारखान्यातील सर्व विभागांचे खातेप्रमुख, अधिकारी, कर्मचारी आणि सुरक्षा रक्षक यांनी एकजुटीने परिश्रम घेतले. या सोहळ्याला परिसरातील प्रतिष्ठित नागरिक व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ट्वेन्टी वन शुगर्स युनिट २ येथे रुद्राभिषेकासह महाप्रसाद कारखाना साईटवर वृक्षारोपण तसेच रक्तदान शिबिर संपन्न





लातुर प्रतिनिधी:- राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्य मंत्री,तथा लातुर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री ट्वेन्टी वन शुगर्सचे संस्थापक अध्यक्ष आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त ट्वेन्टी वन शुगर्स युनिट २ देवीनगर तांडा सायखेडा कारखाना साईट या ठिकाणी कारखान्याचे कार्यकारी संचालक श्री.सुभाष पाटील यांचे हस्ते श्री.गणेश पूजन व श्री.हनुमान मंदिर येथे रुद्राभिषेक करण्यात आला.

तसेच साहेश्वर महादेव मंदिर सायखेडा येथे सरपंच श्री.राजेभाऊ कदम यांचे हस्ते व तुळजाभवानी मंदिर देवी नगर तांडा येथे सरपंच सौ. धोंडाबाई चव्हाण यांचे हस्ते अभिषेक करण्यात आला. दरम्यान माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त ट्वेन्टी वन शुगर्स सायखेडा कारखाना साईट या ठिकाणी रक्तदान शिबीर पार पडले तसेच वृक्षारोपण देखील करण्यात आले. तसेच महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार श्री ह.भ.प.अविनाश महाराज भारती लातूर यांचे कीर्तन पार पडले. यानंतर सर्वांना महाप्रसादाचा लाभ घेतला.

याप्रसंगी कारखान्याचे वर्क्स मॅनेजर सचिनकुमार देशमुख, मुख्यशेती अधिकारी तुकाराम गडदे, चीफ केमिस्ट मेघराज कदम, डिस्टरली मॅनेजर संजय गलांडे,कोजन मॅनेजर संदीप पायमल,इन्स्टुमेंट मॅनेजर सुमंत चौधरी,इलेक्ट्रिक मॅनेजर येरगणी, ई.डी.पी. मॅनेजर विनोद औटे,डे.चीफ केमिस्ट पांडुळे, चीफ. अकाउंट ज्ञानोबा शिरसाट,सीनियर अकाउंट,ऊस विकास अधिकारी शिवप्रसाद येरकर,ऊस पुरवठा अधिकारी सुरेश आळशे,सुधाकर कदम,रतन कदम,हेडटाईम किपर मदन जाधव,सुरक्षा अधिकारी बाळासाहेब हारकाळ,स्टोअर कीपर विनोद पवार, गोडाऊन कीपर मदन जाधव,सिविल इंजि.अमरदीप वाघमारे,परचेस विभाग सुधाकर सातपुते यांच्यासह सर्व विभाग प्रमुख,केमिस्ट, इंजि.ग्री. ओव्हरसिर,ग्री. सुपरवायझर,सर्व कर्मचारी कामगार शेतकरी, उपस्थित होते.

## संपादकीय...

# भोंदू बाबांचा उदय आणि समाजाची जबाबदारी

आजच्या आधुनिक युगात विज्ञान, तंत्रज्ञान आणि शिक्षणाची प्रगती होत असतानाही अंधश्रद्धेचे सावट समाजावर अजूनही मोठ्या प्रमाणात दिसून येते. विविध ठिकाणी स्वतःला गुरू, बाबा किंवा दैवी शक्तीचा प्रतिनिधी म्हणवणाऱ्या व्यक्तींची संख्या वाढताना दिसते. या पार्श्वभूमीवर भोंदू बाबा ही संज्ञा समाजात प्रचलित झाली आहे.

भोंदू बाबा म्हणजे असे लोक, जे लोकांच्या अडचणी, श्रद्धा आणि भावनांचा गैरफायदा घेतात. ते चमत्कार, भविष्यवाणी किंवा समस्यांचे तत्काळ निराकरण यांचे आश्वासन देऊन लोकांना आकर्षित करतात. अनेकदा हे सर्व फसवणुकीवर आधारित असते.

सार्वजनिक जीवनात असलेल्या काही व्यक्तींविषयीही अशा प्रकारच्या चर्चा किंवा आरोप होताना दिसतात. कॅप्टन अशोक खरात यांच्याबाबतही काही ठिकाणी अशा प्रकारच्या मतप्रवाह दिसून येतात. मात्र, अशा दाव्यांकडे पाहताना वस्तुनिष्ठता आणि पुराव्यांची खात्री करणे अत्यावश्यक आहे.

कोणत्याही व्यक्तीला भोंदू बाबा म्हणणे हे केवळ एक शब्दप्रयोग नसून तो एक गंभीर आरोप असतो. त्यामुळे तो वापरताना जबाबदारीची जाणीव असणे गरजेचे आहे. समाजात चुकीची माहिती पसरल्यास त्याचे दूरगामी परिणाम होऊ शकतात.

माध्यमांची भूमिका येथे अत्यंत महत्त्वाची ठरते. मोठ्या दैनिकांनी किंवा न्यूज प्लॅटफॉर्म्सनी सनसनाटी निर्माण करण्यापेक्षा सत्य, तथ्य आणि तपास यांवर आधारित माहिती देणे आवश्यक आहे. पत्रकारितेचे मूलभूत तत्त्व म्हणजे निष्पक्षता आणि जबाबदारी.

लोकांनीही अंधश्रद्धेला बळी न पडता तर्कशुद्ध विचार करणे आवश्यक आहे. कोणत्याही दाव्यावर विश्वास ठेवण्यापूर्वी त्यामागील सत्यता तपासणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे.

सरकार आणि संबंधित संस्था अंधश्रद्धेविरोधात कायदे आणि जनजागृती मोहिमा राबवत आहेत. मात्र, त्यांची अंमलबजावणी प्रभावीपणे होणे गरजेचे आहे.

शिक्षण हे अंधश्रद्धेविरोधातील सर्वात मोठे शस्त्र आहे. वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित केल्यास लोक सहजपणे फसवले जाणार नाहीत.

सोशल मीडियाच्या युगात माहिती वेगाने पसरते, पण त्याच वेगाने चुकीची माहितीही पसरते. त्यामुळे डिजिटल साक्षरता वाढवणे अत्यंत आवश्यक आहे.

व्यक्तींच्या श्रद्धेचा आदर राखणे महत्त्वाचे असले, तरी त्या श्रद्धेचा गैरफायदा घेणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करणे तितकेच आवश्यक आहे.

समाजातील प्रत्येक घटकमाध्यमे, सरकार, शिक्षणसंस्था आणि नागरिकयांनी एकत्रितपणे अंधश्रद्धेविरोधात लढा दिला पाहिजे.

एखाद्या व्यक्तीविषयी आरोप असल्यास ते कायदेशीर मार्गाने तपासले जावे. सोशल मीडियावरील चर्चा ही सत्याची जागा घेऊ शकत नाही.

शेवटी, भोंदू बाबा ही समस्या केवळ व्यक्तींची नसून ती समाजाच्या विचारसरणीशी संबंधित आहे. त्यामुळे त्यावर उपायही व्यापक स्तरावर करावा लागेल.

समाज अधिक प्रगल्भ, वैज्ञानिक आणि जागरूक झाला तर अशा प्रवृत्ती आपोआप कमी होतीलआणि हीच खरी प्रगती ठरेल.

# पाण्याचा दिवस की आपल्या अस्तित्वाचा प्रश्न?




२२ मार्च. दिनदर्शिकेतला एक साधा दिवस. पण त्याला एक नाव आहे World Water Day. आपण तो साजरा करतो, शुभेच्छा देतो, पोस्टर्स शेअर करतो, संदेश लिहितो. काही क्षणांसाठी आपण सगळेच जागरूक नागरिक बनतो. पण या सगळ्या गडबडीत एक प्रश्न शांतपणे उभा राहतो आपण खरंच पाण्याबद्दल जागरूक आहोत का, की फक्त एक दिवस साजरा करून स्वतःला दिलासा देतो आहोत?

पाणी हा शब्द उच्चारला की आपल्या मनात नदी, पाऊस, धबधबा, किंवा थंड पाण्याचा एक ग्लास उभा राहतो. पण त्यामागे एक सत्य आहे पाणी हा केवळ निसर्गाचा भाग नाही, तो आपल्या अस्तित्वाचा पाया आहे. आपण जे खातो, जे पितो, जे श्वास घेतो, त्या प्रत्येक गोष्टीत पाण्याचा अंश आहे. आणि तरीही, आपण त्याला सर्वात सहज उपलब्ध गोष्ट समजून त्याची किंमत विसरतो.

एक छोटासा अनुभव सांगतो. एका गावात गेलो होतो. तिथे एक लहान मुलगा हातात रिकामी बादली घेऊन विहिरीजवळ उभा होता. मला वाटलं तो पाणी भरायला आला आहे. पण थोड्या वेळाने लक्षात आलं तो पाणी भरत नव्हता, तो पाणी यायची वाट पाहत होता. त्याच्या चेहऱ्यावर अधीरता नव्हती, राग नव्हता, फक्त एक सवय होती पाण्याची वाट पाहण्याची सवय. त्या क्षणी शहरातल्या आपल्या आयुष्याची आठवण झाली. आपण नळ उघडतो, आणि दोन सेकंद पाणी नाही आलं की म्हणतो आज प्रेशर नाही. आपल्या अस्वस्थतेत आणि त्या मुलाच्या शांततेत एक मोठा फरक होता. त्याच्यासाठी पाणी ही अपेक्षा होती, आणि आपल्यासाठी ती सवय झाली आहे.

आपण पाण्याचा वापर कसा करतो याकडे पाहिलं तर आपल्याला स्वतःचं चित्र दिसतं. दात घासत असताना नळ चालू ठेवणं, अंघोळ करताना गरजेपेक्षा जास्त पाणी वापरणं, गाड्या धुताना पाण्याचा ओघळ चालू ठेवणं हे सगळं इतकं सामान्य झालं आहे की त्यात चूक दिसत नाही. पण खरं पाहिलं तर ही चूक नाही, ही एक सवय आहे आणि प्रत्येक वाईट सवयप्रमाणेच तीही हळूहळू मोठं नुकसान करत जाते.

आपण नेहमी म्हणतो की पाणी वाचवा. पण वाचवणं हा शब्द आपण किती मनापासून घेतो? पाणी वाचवणं म्हणजे केवळ कमी वापरणं नाही, तर त्याची किंमत ओळखणं आहे. जेव्हा आपण एखादी गोष्ट सहज मिळते म्हणून तिची किंमत करत नाही, तेव्हा आपण तिला गमावण्याच्या दिशेने चालत असतो. पाण्याबाबतही हेच होत आहे. आपण ते गृहित धरतो, आणि म्हणूनच त्याचं महत्त्व आपल्याला ते कमी झाल्यावरच जाणवतं.

निसर्ग आपल्याला नेहमी शिकवत असतो. पाऊस पडतो, पण तो कधीही अतिरेक करत नाही जोपर्यंत आपण त्याचा समतोल बिघडवत नाही. नद्या वाहतात, पण त्या स्वतःचा मार्ग शोधतात. झाडं पाणी साठवतात, जमिनीला ओल ठेवतात. निसर्गात प्रत्येक गोष्ट संतुलनात आहे. पण माणूस त्या संतुलनाशी खेळतो. तो नद्या अडवतो, जंगलं तोडतो, पावसाचं पाणी वाहून जाऊ देतो, आणि मग जेव्हा दुष्काळ येतो तेव्हा तो निसर्गालाच दोष देतो. खरं तर निसर्ग शिक्षा करत नाही, तो फक्त आपल्याला आपल्या कृतींचे परिणाम दाखवतो.

आपण अनेकदा विचार करतो मी एकटा काय करू शकतो? हा प्रश्न खूप सोपा वाटतो, पण त्यातच आपल्या निष्क्रियतेचं उत्तर दडलेलं आहे. कारण प्रत्येक बदलाची सुरुवात ही एका छोट्या कृतीनेच होते. जर प्रत्येकाने एक थेंब वाचवला, तर तोच थेंब एक दिवस नदी बनू शकतो. हे केवळ एक वाक्य नाही, ही एक शक्यता आहे. आपण जेव्हा एखादा नळ बंद करतो, तेव्हा आपण फक्त पाणी थांबवत नाही, आपण एक विचार सुरू करतो.

आपल्या घरात, आपल्या सवयींमध्ये, आपल्या विचारांमध्ये बदल करण्याची गरज आहे. पावसाचं पाणी साठवणं ही केवळ एक तांत्रिक प्रक्रिया नाही, ती एक मानसिकता आहे. मुलांना पाण्याची किंमत शिकवणं ही केवळ शिक्षण नाही, ती एक संस्कार आहे. समाजात जागरूकता निर्माण करणं ही केवळ जबाबदारी नाही, ती एक कर्तव्य आहे.

पण या सगळ्याच्या पलीकडे एक महत्त्वाची गोष्ट आहे आत्मपरीक्षण. आपण स्वतःला विचारलं पाहिजे की आपण पाण्याबाबत किती प्रामाणिक आहोत. आपण जे बोलतो, ते आपण करतो का? आपण जे शिकवतो, ते आपण पाळतो का? कारण बदल हा बाहेरून येत नाही, तो आतून सुरू होतो.

कल्पना करा, एक दिवस असा आला की तुमच्या घरात पाणीच नाही. नळ उघडला, पण काहीच आलं नाही. त्या क्षणी तुम्ही काय कराल? तुम्हाला त्या एका थेंबाची किंमत कळेल का? आणि जर कळली, तर मग आजच का नाही?

२२ मार्च हा केवळ एक दिवस नाही. तो एक स्मरण आहे आपण पाण्याचे मालक नाही, आपण त्याचे संरक्षक आहोत. आपल्याला ते जपायचं आहे, पुढच्या पिढ्यांसाठी, आपल्या स्वतःच्या भविष्यासाठी. कारण जर पाणी नाही, तर काहीच नाही.

आपण विकासाच्या नावाखाली खूप काही मिळवलं आहे. मोठी शहरं, उंच इमारती, आधुनिक सुविधा. पण या सगळ्यात आपण काहीतरी हरवत आहोत निसर्गाशी असलेलं नातं. आणि हे नातं तुटलं, तर त्याची किंमत खूप मोठी असेल.

आज गरज आहे ती केवळ बोलण्याची नाही, तर कृतीची. आपण लहान लहान गोष्टींनी सुरुवात करू शकतो. पाणी वाचवणं, त्याचा योग्य वापर करणं, इतरांना जागरूक करणं या सगळ्या गोष्टी एकत्र येऊन मोठा बदल घडवू शकतात.

आपण अनेकदा मोठ्या समस्यांबद्दल विचार करतो, पण त्यावर उपाय शोधताना आपण स्वतःला बाजूला ठेवतो. आपण वाट पाहतो की कोणी तरी येईल आणि बदल घडवेल. पण खरं पाहिलं तर तो कोणी तरी आपणच आहोत.

पाण्याचा प्रश्न हा केवळ पर्यावरणाचा विषय नाही, तो सामाजिक, आर्थिक आणि मानवी जीवनाशी जोडलेला आहे. पाण्याची कमतरता म्हणजे शेतीवर परिणाम, अन्नावर परिणाम, आरोग्यावर परिणाम. आणि शेवटी, तो आपल्या संपूर्ण जीवनावर परिणाम करतो.

आपण जर आज बदल केला नाही, तर उद्या उशीर होईल. आणि जेव्हा आपण मागे वळून पाहू, तेव्हा आपल्याला जाणवेल की आपण खूप काही गमावलं आहे. पण तेव्हा पश्चात्ताप करण्यापेक्षा आज कृती करणं अधिक महत्त्वाचं आहे.

पाणी ही एक साधी गोष्ट वाटते, पण त्यामागे एक मोठं तत्त्व आहे जीवनाचं तत्त्व. आणि त्या तत्त्वाला आपण जपलं पाहिजे.

शेवटी, एकच विचार मनात ठेवूया प्रत्येक थेंब महत्त्वाचा आहे. कारण तोच थेंब उद्याचं भविष्य घडवतो. आपण जर आज त्याला जपलं, तर उद्या तो आपल्याला जपेल.

आणि म्हणूनच, २२ मार्च हा दिवस साजरा करण्यापेक्षा, तो समजून घेणं आणि त्यानुसार जगणं अधिक महत्त्वाचं आहे.

कारण पाण्याचा प्रश्न हा केवळ पाण्याचा नाही

तो आपल्या अस्तित्वाचा प्रश्न आहे.

**विजयकुमार कट्टी**

# माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त लातूर शहरातील साई मंदिरात रुद्रा अभिषेक संपन्न

लातुर प्रतिनिधी:राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त शनिवार दिनांक २१ मार्च रोजी सकाळी लातूर शहरातील विशाल नगर येथील साई मंदिरात



धर्मविर औदुंबर पाटील बट्टेवार बहुउद्देशिय संस्थेच्या वतिने रुद्रा अभिषेक करण्यात आला. संजय महाराज धारूरकर यांच्या मंत्रोपचारात रुद्राअभिषेक संपन्न झाला.

यावेळी धर्मविर औदुंबर पाटील बट्टेवार बहुउद्देशिय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष तथा लातुर शहर जिल्हा काँग्रेसचे सरचिटणीस अविनाश बटटेवार, विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखान्याचे संचालक सुरेश चव्हाण,लातूर शहर महानगरपालिकेचे माजी उपमहापौर कैलास कांबळे,काँग्रेसचे प्रभाग क्रमांक १६ चे प्रभाग अध्यक्ष बालाजी गवळी,आडत व्यापारी बालाजी जाधव,ज्ञानोबा. साखरे,प्रशांत खाडप,तानाजी सुर्यवंशी,अँड सचिन पंचाक्षरी,रोहित क्षिरसागर,संदिप बिराजदार आदि उपस्थित होते.

# माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त संत गोरोबा सोसायटी महिला मंडळाकडून स्वामी समर्थ महाराजांची आरती व अन्नदान.

लातुर प्रतिनिधी:–राज्याचे माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त लातुर शहरातील संत गोरोबा सोसायटी महिला मंडळाच्या वतीने श्री स्वामी समर्थ महाराजांची विधिवत पूजन करण्यात आले.



तसेच यावेळी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांना निरोगी दीर्घायुष्य,यशस्वी राजकीय कारकीर्द आणि अखंड जनसेवा त्यांच्या हस्ते घडत राहो अशी श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या चरणी मनोभावे प्रार्थना करण्यात आली.

दरम्यान या पवित्र प्रसंगी परिसरातील बाल गोपाळ, महिला भगिनी,नागरीक यांच्या समवेत अन्नदान उपक्रम राबवत आमदार अमित देशमुख यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात आणि आनंददायी वातावरणात साजरा करत अभिष्टचिंतन्यात आले.

# ध्येय एज्युकेशन फाउंडेशनचा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार युवराज हिरवे यांना जाहीर

केज/प्रतिनिधी-केज तालुक्यातील कळंबआंबा येथील भूमिपुत्र ,मानेवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक युवराज अभिमन्यू हिरवे यांच्या शैक्षणिक उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन ध्येय एज्युकेशन फाऊंडेशनचा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाला आहे. याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.



शिक्षण क्षेत्रातील सातत्य पूर्ण कार्य, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी कायम धडपड, विविध शैक्षणिक उपक्रमातील नाविन्यता, सामाजिक उपक्रमात सक्रिय योगदान शाळा परिसर व गाव परिसर ५०९ च्या वर झाडे लावुन संगोपन केले.

लोकसहभागातुन विद्यार्थ्यांना लॅपटॉप संगणक दिले.शाळा परिसर तंबाखूमुक्त केला व केज तालुक्यातील शाळा परिसर तंबाखुमुक्त करण्यासाठी तालुका समन्वयक म्हणुन कार्य केले. आडस केंद्र तंबाखुमुक्त केले. बालविवाह रोखण्यासाठी केंद्रसमन्वयक म्हणुन कार्य केले. पाणी फाऊंडेशन वॉटरकप स्पर्धा हिरीरीने सहभाग, गावाला व्दितीय क्रमांकाचे बक्षीस मिळवुन दिले. करोना कालावधीमध्ये वेगवगेळ्या सेवाभावी संस्थेच्या माध्यमातुन गरजू व्यक्तींनां अन्नधान्य किटचे वाटप केले. अंधश्रद्धा निर्मूलन, स्वच्छता मोहीम विविध स्पर्धा यांचे आयोजन,अक्षर परिवार समूह कार्य,महापुरुषांच्या जयंती पुण्यतिथि व्याख्याने, कविसंमेलन, पोवाडे, साजरे करून सामाजिक सलोखा अबाधित ठेवण्यासाठी पुढाकार घेतला अशा कार्याची दखल घेऊन त्यांना आदर्श शिक्षक पुरस्कार ग दि माडगूळकर नाट्यगृह निगडी पिंपरी चिंचवड पुणे या ठिकाणी विविध मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे.

यापूर्वी त्यांना जलरत्न पुरस्कार, आदर्श शिक्षक पुरस्कार, कोरोना योद्धा पुरस्कार यासह विविध पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले आहे.

हा आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

# काळेगाव(घाट) सज्जाचे तलाठी यांची तात्काळ बदली करण्याची ग्रामस्थांनी केली तहसीलदार यांच्याकडे मागणी



केज/प्रतिनिधी □ळेगाव (घाट) सज्जाचे तलाठी के.डी. बिराजदार यांची तात्काळ बदली करण्यात यावी अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे ग्रामस्थासह सरपंच यांनी केज तहसीलदार यांच्याकडे केली आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, केज तालुक्यातील काळेगाव (घाट) तलाठी सज्जाचे तलाठी म्हणून के.डी. बिराजदार कार्यरत आहेत परंतु तलाठी बिराजदार हे नागरिकांची कामे करण्यास जाणीवपूर्वक टाळाटाळ करत असल्याचा आरोप लेखी निवेदनात ग्रामस्थांसह सरपंच यांनी केला आहे.

तहसीलदार केज यांना दिलेल्या निवेदनात म्हटले की, तलाठी के.डी. बिराजदार हे त्यांच्या कर्तव्यात सक्रिय नसून ग्रामस्थांचे अनुदान, वारसाचा फेर, ई-पीक पाहणी, शाळेतील विद्यार्थ्यांना लागणारे शासकीय कागदपत्रे इत्यादी कामे करण्यासाठी जाणीवपूर्वक टाळाटाळ करत आहेत.

तसेच नागरिकांना उडवा उडवीची उत्तरे देण्यात आली आहेत. त्यांना मोबाईल फोन द्वारे किंवा प्रत्यक्ष भेटायचे असेल तर त्यांचा संपर्क ही सहजासहजी शक्य होत नाही.

तसेच नागरिकांना मा. न्यायालयात जामीन घेण्यासाठी व बँकेसाठी लागणारे कागदपत्र, ७/१२आठ-अ इत्यादीसाठी सामान्य नागरिकांची मोठी कोंडी होत आहे. त्याचबरोबर निराधार, प्रौढ,वृद्ध व्यक्तींना श्रावणबाळ योजनेसह इतर शासनाच्या योजनेचा लाभ घेण्यासाठी लागणारे कागदपत्र मिळवण्यासाठी खूप चक्रा माराव्या लागतात. त्या अनुषंगाने दिनांक १७ नोव्हेंबर २०२५ रोजी आपणास निवेदन देण्यात आले होते. त्या निवेदनाच्या अनुषंगाने संबंधित तलाठी यांनी ग्रामस्थांना सांगितले की, मी तुमच्या गावातील सर्व कामे वेळेत करतो कोणालाही आडवून धरणार नाही निवेदन परत घ्या असे म्हणाले असता. सदर प्रकरणी सिमेंटपत्र घडवून आणले होते. तसे आपल्या कार्यालयास व आपणास कळविले होते परंतु त्यानंतर आठ ते पंधरा दिवस संबंधित तलाठी हे व्यवस्थित कामे करू लागले त्यानंतरच्या काळात पहिलेच पाढे गिरवू लागले आहेत त्यांच्या या वर्तनास ग्रामस्थ वैतागलेले आहेत. तरी सदरील तलाठी यांची काळेगाव सज्जातून तात्काळ बदली करून त्यांच्या जागी दुसरे तलाठी यांची नियुक्ती करण्यात यावी अशी लेखी निवेदनाद्वारे ग्रामस्थासह सरपंच यांनी केज तहसीलदार यांच्याकडे मागणी केली आहे.

या लेखी निवेदनावर सरपंच अविनाश गाताडे, दत्तात्रय आगे, गुरुलिंग गिराम, राहुल कोठावळे यांच्यासह ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# पोद्दार हॉस्पिटलच्या मोफत अस्थिरोग. शिबिरात ७८ रुग्णांची तपासणी - उपचार






लातूर : प्रतिवर्षीप्रमाणे यावर्षीही माजी मंत्री आ. अमित देशमुख यांच्या जन्मदिनानिमित्त येथील ख्यातनाम अस्थिशल्य चिकित्सक डॉ. अशोक पोद्दार यांच्या पोद्दार हॉस्पिटलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या मोफत अस्थिरोग शिबिरात ७८ रुग्णांची तपासणी व उपचार करण्यात आले. पोद्दार हॉस्पिटलच्या वतीने आयोजित करण्यात आलेले हे १६९ वे मोफत आरोग्य शिबीर होते.

या शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी लातूर शहर मनपाचे विद्यमान उपमहापौर एड. स्नेहल उटगे, माजी उपमहापौर कैलास कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी लातूर आयएमएचे अध्यक्ष डॉ . अभय कदम, डॉ. संजय शिवपूजे , डॉ. शशी पाटील, डॉ. मंगेश कुलकर्णी, डॉ. अभय कुलकर्णी, डॉ. पल्लवी जाधव, प्रसाद उदगीरकर, जयेश बजाज, श्याम धूत, रामेश्वर सोमाणी, विजय पस्तापुरे , बालाप्रसाद सारडा, विजय रांदड आदी मान्यवर उपस्थित होते. दीपप्रज्वलन व धन्वंतरी पूजनाने शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. पोद्दार हॉस्पिटलच्या प्रमुख पाहुण्यांचा ह्रद्य सत्कार करण्यात आला. यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना एड. स्नेहल उटगे यांनी माजी मंत्री आ. अमित देशमुख यांच्या जन्मदिनानिमित्त प्रतिवर्षी अशा प्रकारच्या मोफत शिबिराचे आयोजन केले जाते, ही बाब अतिशय महत्वाची आहे. समाजातील सर्वच स्तरातील रुग्णांना या शिबिराचा चांगलाच फायदा होतो. आ. अमित देशमुख यांचे नेतृत्व सर्वव्यापी असल्याने त्यांच्याप्रती अशा पद्धतीने स्नेह व्यक्त करणारी मंडळीही मोठ्या संख्येने लातुरात आहे, ही बाब खरोखर गौरवास्पद असल्याचे त्यांनी सांगितले.

माजी उपमहापौर कैलास कांबळे यांनी आपल्या मनोगतात डॉ. अशोक पोद्दार प्रतिवर्षी आ. अमित देशमुख यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून मोफत शिबिराचे आयोजन करतात, ही बाब आता लातूरच्या सामान्य रुग्णांनाही माहिती झाली आहे. त्यामुळे अनेक रुग्ण या शिबिराची आतुरतेने प्रतीक्षा करताना दिसतात. लातुरात वैद्यकीय क्षेत्रात मोफत आरोग्य शिबिराचा पॅटर्न आणण्याचे काम डॉ. अशोक पोद्दार यांनी केले असून वैद्यकीय क्षेत्रातील कार्याबरोबरच ते सामाजिक कार्यातही अग्रेसर असल्याची भावना कांबळे यांनी व्यक्त केली. सामाजिक कार्यकर्ते प्रसाद उदगीरकर यांनी आपल्या मनोगतात डॉ. पोद्दार यांच्या आरोग्यविषयक कार्याचा गौरव करून समाजसेवेच्या ध्यासाने झपाटलेले वैद्यकीय क्षेत्रातील अग्रगण्य चेहरा म्हणजे डॉ. अशोक पोद्दार असल्याचे सांगितले. जयेश बजाज यांनी यावेळी बोलताना डॉ. अशोक पोद्दार यांना अशा प्रकारच्या मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करून रुग्णांना मोफत आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याचा जणू छंदच जडला असल्याचे बोलून दाखवले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. अशोक पोद्दार यांनी केले. प्रास्ताविकापूर्वी त्यांनी आ. अमित देशमुख यांना जन्मदिनाच्या शुभेच्छा देऊन त्यांच्या जन्मदिनाच्या अनुषंगाने आपल्या हॉस्पिटलच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे सांगितले. ज्या समाजाने आपल्याला एवढे काही भरभरून दिले आहे, त्या समाजाचे आपणही काही देणे लागतो या भावनेने आपण मोफत आरोग्य शिबीराच्या आयोजनास प्राधान्य देत असल्याचे सांगितले. आ. अमित देशमुख यांच्या जन्मदिवसानिमित्त २००९ पासून सातत्याने असे मोफत शिबीर आयोजित केले जाते. आज वैद्यकीय सेवा सुविधा खूप महागल्या आहेत. सामान्य रुग्णांना चांगल्यात चांगल्या सेवा सुविधा मोफत तसेच माफक शुल्कात उपलब्ध करून देण्याचा हा छोटासा प्रयत्न आहे. समाजाच्या सर्वच स्तरातील रुग्ण त्याचा पुरेपूर लाभ घेतात, हेच या शिबिराचे सर्वात मोठे यश असल्याचे त्यांनी बोलून दाखवले. १९९९ पासून हॉस्पिटलच्या आईने उन्हाळ्यात नागरिकांना पिण्याच्या थंड पाण्याची सोय करण्यासाठी पाणपोई चालवली जाते. या पाणपोईत थंड पाण्याचे जार उपलब्ध करून दिले जातात. दिवसभरात हजारो नागरिक या पाणपोईचा लाभ घेतात असेही त्यांनी सांगितले. डॉ. अशोक पोद्दार महाराष्ट्र अस्थिरोग तज्ज्ञ संघटनेचे पदाधिकारी असून लातूर जिल्हा अस्थिरोग तज्ज्ञ संघटना, आयएमएम महाराष्ट्र, आयएमए लातूर, आशादीप , दिशा फाउंडेशन , रोटरी परिवार अशा विविध संघटनांच्या माध्यमातून कायम रुग्णसेवा आणि समाज कार्यात अग्रेसर असतात.

आजच्या शिबिरात एकूण ७८ रुग्णांची तपासणी करण्यात आली. यामध्ये २७ रुग्णांचे एक्सरे ५० टक्के सवलतीच्या दरात काढण्यात आले. रक्त व लघवी तपासणीही ५० टक्के सवलतीच्या दरात करण्यात आली. सर्वच्या सर्व ७८ रुग्णांची हाडांच्या ठिसूळतेची मोफत तपासणी करण्यात आली. गरजू रुग्णांना मोफत फिजिओथेरपीची सुविधा ही देण्यात आली. शिबिराच्या यशस्वीतेसाठी हॉस्पिटलचे व्यवस्थापक वसीम शेख यांच्यासह सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. शिबिरातील रुग्णांना मोफत औषधीही उपलब्ध करून देण्यात आली.

# 'सांदिपनी' इंजिनिअरिंग , पॉलिटेक्निकमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा उत्साहात साजरा




लातूर : लातूर शहरापासून जवळच असलेल्या कोळपा येथील सांदिपनी टेक्निकल कॅम्पस फॅकल्टी ऑफ इंजिनिअरिंग अँड पॉलिटेक्निक महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा युगांतर २०२६ दयानंद सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

या स्नेहसंमेलन सोहळ्याचे उदघाटन मराठी सिने अभिनेत्री सिमरन खेडकर यांच्या हस्ते करण्यात आले. यात्प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष विनोद अग्रवाल, उपाध्यक्ष डॉ. अनिल राठी , विजय हिबारे, इंजिनिअरिंग कॉलेजच्या प्राचार्या डॉ. संजीवनी कुलकर्णी, पॉलिटेक्निकच्या प्राचार्या वाकडे शितल, प्रबंधक बडगीरे उध्दव आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मान्यवरांच्या हस्ते महाविद्यालयाच्या सर्व विद्या शाखांच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर शैक्षणिक वर्षात उल्लेखनीय कामगिरी करणारे प्रा. डॉ. आशिष अग्रवाल, चोपने अजय व रुपाली शिंदे यांचा संस्थेच्या वतीने गौरव करण्यात आला. यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना डॉ. अनिल राठी यांनी महाविद्यालयातील सर्व गुणवंत विद्यार्थी व प्राध्यापक वृंदांचे कौतुक केले. अल्पावधीतच महाविद्यालयाने शैक्षणिक क्षेत्रात निर्माण केलेली ओळख पाहून समाधान व्यक्त करून त्यांनी भविष्यात सांदिपनी महाविद्यालय शिक्षण क्षेत्रात यापेक्षाही अधिक भरारी घेईल असा विश्वास व्यक्त केला.

आपल्या उद्घाटनपर मनोगतात अभिनेत्री सिमरन खेडकर यांनी आपण स्वतः लातूरची कन्या असल्याने या सोहळ्यास आवर्जून उपस्थित राहण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले. इंजिनिअरिंग, पॉलिटेक्निक अशा विविधतेने नटलेले हे प्रगतिपथावरील महाविद्यालय पाहून आपल्याला अतिशय आनंद झाल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक इंजिनिअरिंगच्या प्राचार्या डॉ. संजीवनी कुलकर्णी यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी संस्थेच्या प्रगतीविषयी सविस्तर माहिती दिली. आपल्या संस्थेच्या १५ वर्षाच्या कार्यकाळात झालेल्या शैक्षणिक प्रगतीबद्दल संस्थेचे कार्यकारी मंडळ तसेच पालकवर्गही समाधान व्यक्त करतात हे पाहून सर्व स्टाफही अधिक कार्यक्षमतेने काम करत असल्याचे त्या म्हणाल्या. वर्ष २०२४ - २५ मध्ये संस्थेमध्ये शिक्षण घेतलेल्या एकूण ९५ टक्के विद्यार्थ्यांची कॅंपसमध्ये निवड झाली असून यावर्षीही ८० टक्क्यांहून अधिक विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. अजूनही यावर्षी कॅंपसमध्ये निवड होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ अपेक्षित आहे. पालकांनी आपल्या पाल्यांच्या भवितव्याबद्दल कोणतीही चिंता करू नये, असेही त्यांनी आश्वस्त केले.

कार्यक्रमास स्नेहसंमेलन प्रमुख प्रा. बी.एम. सातपुते , प्रा. व्ही.एम. गीर, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. एम.डी. लोमटे,प्रा. पी.जे. गरड यांसह सर्व विभाग प्रमुख , प्राध्यापक व विद्यार्थी प्रतिनिधी अमन गुट्टे, अभय पिंपळे , चिन्मय गायकवाड आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनाली कुलकर्णी, प्रा.वेदपाठक यांनी आभार प्रदर्शन प्रा. सातपूते यांनी केले.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर - ४१३५१२ येथे प्रकाशित केले.